■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २८२ ■ सोमवार दि.३० जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 282 ■ Monday Dt.30 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# रात्री अकरा वाजता आरोपी सोबत संदीपभैय्या तुम्ही काय करत होतात? या मागचं कारण काय आरोपीचं आणि तुमचं कनेक्शन काय?

## दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली नाही तर त्यांनी पोलिसांकडे सरेंडर केलं त्यामुळे दोन्ही आरोपी आणि आ.संदीप क्षीरसागरांचे सीडीआर काढा? : मुंडे

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## माजी मंत्री धनंजय मुंडेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट; विनयभंगाच्या प्रकरणात महिला आयपीएस च्या नेतृत्वात एसआयटी नेमण्याची केली मागणी!

# आ. संदीप भैय्या विजय पवारला साथ देऊन स्वत:चे अस्तित्व खराब करून घेऊ नका नसता जनता तुम्हाला निवडणुकीतून हद्दपार करतील?

## विजय पवार याला राजकीय पाठबळ असल्याचा माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा आरोप?

- बीडचे आमदार संदीप क्षीरसागर या प्रकरणाचे मुख्य आका? : धनंजय मुंडे
- गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी थेट पोहचला आमदार क्षीरसागर यांच्या निवासस्थानी : मुंडे
- स्वर्गीय केशर काकूंचे आमदार असलेले नातू निर्लज्ज माणसाच्या पाठीशी असतील तर इतरांनी काय आदर्श घ्यायचा?

बीड । प्रतिनिधी

खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये 'नीट' ची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीची छेडछाड आणि लैंगिक छळ प्रकरणी दोन शिक्षकांवर पोस्को अंतर्गत बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शिक्षकांवरच गुन्हा दाखल झाल्यानं शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विजय पवार आणि प्रशांत खाटोकर असे या दोन शिक्षकांचे नाव असून बीड शहरात हे दोघे जण खाजगी कोचिंग क्लासेस चालवतात.






विजय पवार आणि प्रशांत खाटोकर असे या दोन शिक्षकांचे नाव असून विजय पवार याला राजकीय पाठबळ असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. तर आरोपी शिक्षक विजय पवार हा विद्यमान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचा कार्यकर्ता असून त्याचे अनेक फोटो सोशल माध्यमावर व्हायरल होत आहे. त्यामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आक्रमक पवित्रा घेत थेट आमदार संदीप क्षीरसागर यांच्यावर आरोप केला असून, दुसरीकडे धनंजय मुंडे यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक नेमण्याची मागणी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

बीडच्या उमाकिरण शैक्षणिक संकुलात विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या शिक्षकांनी नीट परिक्षेची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय मुलीचा लैंगिक छळ केला. फरार असलेल्या दोन्ही शिक्षकांना अटक करण्यात आली. बीड न्यायालयाने दोघांनाही दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणावरून माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आरोपी शिक्षक विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागर राईट हॅन्ड असल्याचा आरोप केलाय. यासोबत धनंजय मुंडे यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक नेमण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री

पान २ वर

### आरोपींवर कडक कारवाईची पोलीस अधीक्षकांकडे मागणी!

बेल्सपाल्सी आजारामुळे धनंजय मुंडे मागील बरेच दिवस सार्वजनिक कार्यक्रमापासून दूर होते. धनंजय मुंडे कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेत होते. मात्र या दरम्यान ते भाषणांपासून दूर राहिले. परंतु आज अखेर धनंजय मुंडे यांनी आपले मौन सोडून आमदार संदीप क्षीरसागर यांची कोंडी केली. धनंजय मुंडेंसह पंकजा मुंडे यांनी देखील या प्रकरणात आरोपींवर कडक कारवाईची मागणी पोलीस अधीक्षकांकडे केली.

### आ.संदीप क्षीरसागरांवर थेट आरोप

बीडमधील खासगी शिकवणीचालक आणि अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळ प्रकरणात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल झालेला आरोपी विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागर यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळेच विजय पवारला आमदार क्षीरसागर यांनी बीडच्या शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष केले होते. विजय पवारविरुद्ध गुन्हा दाखल झाला त्याच रात्री तो आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासोबत होता आणि त्या पुढच्या दोन दिवसात पीडितेच्या वडिलांना २० फोन गेले, असा आरोप धनंजय मुंडेंनी केला. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली नाही तर त्यांनी पोलिसांकडे सरेंडर केलंय. त्यामुळे दोन्ही आरोपी आणि संदीप क्षीरसागर यांचे सीडीआर काढावेत. ज्या रात्री गुन्हा नोंद झाला. त्याच दिवशी अकरा वाजता बीडचे आमदार संदीप क्षिरसागर हे आरोपीसोबत होते. हे पोलीस तपासात समोर येणं आवश्यक आहे. ते सोबत का होते? यामागचं कारण काय? आरोपीचं आणि आमदारांचं कनेक्शन काय, हे कळायला हवं, असंही धनंजय मुंडे म्हणाले.

### आज सायंकाळी कॅन्डल मार्च!

अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळ प्रकरणाच्या निषेधार्थ बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आज (दि.३०) सायंकाळी ६ ते ७ दरम्यान कॅन्डल मार्च काढण्यात येणार आहे. यात सर्वस्तरातील महिला भगिनी सहभागी होणार आहेत.

## बीड हादरले! अल्पवयीन विद्यार्थिनीवर १० महिने लैंगिक अत्याचार प्रकारातील आरोपींवर डॉ. ऋषिकेश विघ्ने यांची कठोर कारवाईची मागणी

### शिक्षण क्षेत्रात संतापाची लाट; दोन प्राध्यापक अटकेत, मुख्याध्यापिकाही संशयाच्या घेऱ्यात

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर गेल्या १० महिन्यांपासून सुरू असलेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणात डॉ. ऋषिकेश विघ्ने यांनी कठोर कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणी प्राध्यापक विजय पवार आणि प्रशांत खाटोकर यांच्यावर पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे, तर एका मुख्याध्यापिकेसह ड्रायव्हरही संशयाच्या घेऱ्यात आहेत. या घटनेमुळे संपूर्ण शिक्षण क्षेत्रात संतापाची लाट उसळली असून, आपल्या मुला-मुलींना कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षणासाठी पाठवावे की नाही, असा प्रश्न पालकांमध्ये निर्माण झाला आहे.

कोचिंग क्लासमध्ये अमानुष छळ

बीड शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलातील एका कोचिंग क्लासमध्ये ही धक्कादायक घटना घडली. प्राध्यापक विजय पवार आणि प्रशांत खाटोकर यांनी एका अल्पवयीन विद्यार्थिनीचा गेल्या १० महिन्यांपासून लैंगिक छळ केल्याचे समोर आले आहे. या नराधमांनी विद्यार्थिनीला क्लासमधील केबिनमध्ये बोलावून तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला. इतकेच नाही, तर तिचे कपडे काढून अश्लील फोटो काढल्याचेही उघड झाले आहे. पीडित मुलीने धीर धरून हा सर्व प्रकार आपल्या पालकांना सांगितल्यावर, शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध 'पॉक्सो' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. शिक्षकांसारख्या आदरणीय व्यक्तींकडून असे घृणास्पद कृत्य घडल्याने समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पान २ वर

## विद्यार्थिनीच्या लैंगिक छळाप्रकरणी आरोपींवर कडक कार्यवाही करा : ना. पंकजा मुंडेंच्या एसपींना सूचना

बीड । प्रतिनिधी

शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलात कोचिंग क्लास मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीचा लैंगिक छळ करणाऱ्या आरोपींविरुद्ध कठोर



आणि कडक कार्यवाही करा अशा सूचना पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी एसपींना केल्या आहेत.

या घटनेविषयी पंकजाताई मुंडे यांनी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशी नुकतीच घटनेची माहिती घेवून याविषयी सूचना केल्या.

उमाकिरण शैक्षणिक संकुलातील शिक्षक प्रशांत खटावकर आणि विजय पवार या दोघांनी एका सतरा वर्षीय विद्यार्थिनीचे गेल्या एक वर्षापासून लैंगिक शोषण केले, याविरूध्द सदर विद्यार्थिनीने शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल केल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी लगेच पोलिस अधीक्षकांना फोन करून आरोपींना तात्काळ अटक करण्याची सूचना केली होती. मुळातच ही घटना अतिशय संतापजनक आणि जिल्ह्याला काळीमा फासणारी आहे, शिक्षकांचे हे कृत्य गंभीर स्वरूपाचे आहे, त्यांना ताब्यात घेतले असले तरी ते सुटले जावू नयेत, यासाठी त्यांचेवर तात्काळ कडक कार्यवाही करा अशी सूचना ना. पंकजाताई मुंडेंनी केली. यासंदर्भात आणखी पालकांच्या तक्रारी असल्यास त्यांना शासनाची संपूर्ण सुरक्षा दिली जाईल, त्यांनी यासाठी पुढे यावे असे आवाहनही ना. पंकजाताईंनी केले आहे.

## गेवराई तहसील कार्यालयातील गोंधळ

### तहसीलदार संदीप खोमने यांच्या निष्काळजीपणामुळे वृद्ध महिलांचे हाल डीबीटी नोंदणी रखडली

गेवराई । प्रतिनिधी

गेवराईचे तहसीलदार संदीप खोमने यांच्या बेजबाबदार कारभारामुळे डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (डीबीटी) नोंदणीचे काम रखडले आहे. यामुळे हजारो वृद्ध आणि महिला पेन्शनधारकांना संजय गांधी आणि श्रावणबाळ पेन्शन योजनांचे लाभ बंद झाले आहेत. विशेषत: वृद्ध महिलांना दररोज तहसील कार्यालयात लांबच लांब रांगा लावून खेट्या माराव्या लागत आहेत, कारण डीबीटी नोंदणीसाठी आवश्यक ओटीपी व्हेरिफिकेशन होत नाही. या गोंधळामुळे लाभार्थी त्रस्त झाले असून, त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.



लाभार्थींचा आरोप आहे की, तहसीलदार संदीप खोमने आणि त्यांच्या यंत्रणेने डीबीटी नोंदणी प्रक्रियेला गती देण्यासाठी कोणतेही प्रभावी पाऊल उचललेले नाही. आधार-लिंक बँक खात्यांची पडताळणी आणि ओटीपी व्हेरिफिकेशन प्रक्रियेत तांत्रिक अडचणी येत असून, यंत्रणेच्या उदासीनतेमुळे वृद्धांना रोज कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहेत. आम्ही वयोवृद्ध आहोत, रोज येथे येणे आम्हाला त्रासदायक आहे. ओटीपी येत नाही, आणि कामही पुढे सरकत नाही, अशी खंत एका वृद्ध महिलेने व्यक्त केली. यामुळे औषधे, अन्न आणि मूलभूत गरजांसाठी पैशांची चणचण भासत आहे.स्थानिक आजी-माजी आमदार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन समस्या सोडवावी व जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांच्या ढिसाळ कारभाराची चौकशी करून तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी होत आहे. डीबीटी नोंदणीसाठी विशेष कक्ष स्थापन करणे आणि तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घेणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत आहे.

लाभार्थ्यांनी तात्काळ डीबीटी नोंदणी पूर्ण करून पेन्शन लाभ पुन्हा सुरू न झाल्यास तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तहसीलदार संदीप खोमने यांच्या कारभाराची तपासणी करावी आणि लाभार्थ्यांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करावे, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा, वृद्ध आणि गरजूंचा संताप जनक्षोभात रूपांतरित होऊ शकतो.

# दलित महिलेला व कुटुंबाला मारहाण केलेल्या ॲड.राम केरबा गवते व त्याच्या सहकाऱ्यांना तात्काळ अटक करा : पीडित कुटुंबाची मागणी

# ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल होऊन दहा दिवस झाले तरीही आरोपीस अटक नाही

## माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पीआय कोळी यांनी आरोपी सोबत आर्थिक तडजोड केल्याचा कुटुंबाचा आरोप?

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये सतत मारहाणीच्या घटना घडत आहेत. मात्र मारहाणीच्या घटनेवर कठोर कारवाई झाल्याचे दिसत नाहीये. अशा तिलच एक माजलगाव तालुक्यातील घटना दि.१९ गुरुवार रोजी गोविंदपूर गावातील जुन्या राजकीय वैमनस्यातून अनुसूचित जातीच्या महिलांवर थेट घरात घुसून बेदम मारहाण करण्यात आली. जीवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्या. या धक्कादायक प्रकारामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, पीडित महिलांनी थेट माजलगाव पोलीस ठाण्यात धाव घेत सहा जणांविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल केला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, गावातील काही स्थानिक राजकीय व्यक्तींनी आपल्या मनातील जुन्या वादातून अनुसूचित जातीच्या काही महिलांच्या घरी जाऊन त्यांना मारहाण केली. आरोपींनी महिलांना शिवीगाळ करत प्राणघातक धमक्याही दिल्या. या प्रकारामुळे पीडित कुटुंबांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालेले आहे. घटनेची माहिती मिळताच माजलगाव ग्रामिण पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. संबंधित आरोपींचा शोध सुरू असल्याचे सांगण्यात येते परंतु आरोपी मोकाट फिरत आहेत अजूनही आरोपींना अटक का नाही त्यामुळे पोलीस प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे यामध्ये ग्रामीण पोलीस स्टेशनचे पीआय बालक कोळी यांनी आरोपीं सोबत आर्थिक तडजोड केल्याचा कुटुंबाचा आरोप आहे.

मारहाण केलेल्या संबंधितांविरोधात बी एन एस २०२३ नुसार ॲड.राम केरबा गवते, भागीत्राबाई केरबा गवते, लखन केरबा गवते, आप्पासाहेब इंद्रजीत गवते, ठकाराम सुखदेव गायकवाड, बुवाजी विलास गवते यांच्यावर पुढील भारतीय न्याय संहिता(बी एन एस)२०२३ कलम,१०९,११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), १८९(२), १९०,१९१ (२), १९१(३), अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक )अधिनियम १९८९ , ३(१)ी, ३(१)(ी), ३(२)(पाच) अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु आज या घटनेला दहा दिवस होऊनही आरोपीस अटक नाही. यात मात्र शंका वाटत आहे यात मारहाण झालेल्या महिलांच्या सांगण्या नुसार महिला नेहमीप्रमाणे घरी होत्या. तेव्हा अचानक गावातील ॲड.राम केरबा गवते आणि त्याच्या कुटुंबातील पाच जण घरात घुसले आणि मारहाण सुरू केली. यात जातीवाचक अपशब्द वापरून अपमान केला गेला व त्यांना ॲड.राम केरबा गवते याने आवळे कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी ही देण्यात आली गावात तणावाचं वातावरण असून आरोपी मात्र अजूनही फरार आहेत. यामुळे घटनेतील आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी व पिडीत कुटुंबाला संरक्षण देण्याची मागणी होत आहे.

## आम्ही बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रेरित असलेल्या शिंदे शिवसेनेच्या; महिला पदाधिकाऱ्यांकडून निघाले पत्रक

गेवराई । प्रतिनिधी



शिवसेना शिंदे गट महिला तालुकाध्यक्षपदी एक वर्षापूर्वी गंगाबाई आबासाहेब खवणे यांची नियुक्ती करण्यात आली होती त्याच बरोबर शकुंतला घुंगासे यांचीही एक वर्षापूर्वी शिवसेना शिंदे गटाच्या जिल्ह्याच्या समितीवर निवड करण्यात आली होती. या दोघीही वर्षभरापासून शिवसेना शिंदे गटाच काम करत आहेत परंतु काल परवाच्या दैनिक सामना मध्ये शिवसेना उबाठा गटाच्या गेवराई महिला पदाधिकाऱ्यांच्या विविध पदाच्या निवडीची यादी आली आहे. यामध्ये गंगाबाई आबासाहेब खवणे यांची उपतालुका संघटक पदी तर शकुंतला घुंगासे यांची शहर संघटक पदी निवड करण्यात आली असल्याची माहिती छापून आली आहे. परंतु याबाबत आम्हाला न विचारता हे पदे देण्यात आली असून आम्ही शिवसेना उबाठा गटाचे काम करत नाही हे पद आम्हाला मान्य नाही जरी आम्हाला न कळवता ही पदे दिली आहे त्यामुळे आम्ही या पदाचा राजीनामा देत आहोत असा खुलासा गंगाबाई खवणे व शकुंतला घुंगासे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.


याबाबत सविस्तर वृत्त असे की, दोन दिवसा पूर्वी दैनिक सामना या वृत्तपत्रांमध्ये शिवसेना उबाठा गटाच्या बीड जिल्ह्यातील महिला पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्याचे छापून आले आहे. या मध्ये गेवराई तालुक्यातील महिलांचे विविध पदे घोषित करण्यात आले आहे. हे पदे जहीर होताच गंगाबाई खवणे व शकुंतला घुंगासे यांनी या जाहीर झालेल्या पदाबाबत पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे की, शिवसेना शिंदे गट महिला तालुकाध्यक्षपदी एक वर्षापूर्वी गंगाबाई आबासाहेब खवणे यांची नियुक्ती करण्यात आली होती त्याच बरोबर शकुंतला घुंगासे यांचीही एक वर्षापूर्वी शिवसेना शिंदे गटाच्या जिल्ह्याच्या समितीवर निवड करण्यात आली होती. या दोघीही वर्षभरापासून शिवसेना शिंदे गटाच काम करत आहेत परंतु काल परवाच्या दैनिक सामना मध्ये शिवसेना उबाठा गटाच्या गेवराई महिला पदाधिकाऱ्यांच्या विविध पदाच्या निवडीची यादी आली आहे. यामध्ये गंगाबाई आबासाहेब खवणे यांची उपतालुका संघटक पदी तर शकुंतला घुंगासे यांची शहर संघटक पदी निवड करण्यात आली असल्याची माहिती छापून आली आहे. परंतु याबाबत आम्हाला न विचारता हे पदे देण्यात आली असून आम्ही शिवसेना उबाठा गटाचे काम करत नाही हे पद आम्हाला मान्य नाही जरी आम्हाला न कळवता ही पदे दिली आहे त्यामुळे आम्ही या पदाचा राजीनामा देत आहोत असा खुलासा गंगाबाई खवणे व शकुंतला घुंगासे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

## नाईक वस्ती येथील सिमेंट कॉंक्रिट रस्ता व नालीच्या कामाचे उद्घाटन

### शहराच्या विकासासाठी शिवछत्र परिवार कधी मागे हटणार नाही : रणवीर पंडित

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात नगरपरिषदेच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे सुरू आहेत, नगरपरिषदेच्या वतीने विविध पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील नाईक वस्ती वैजनाथ मोरे यांचे घर व दिलीप मोरे यांच्या घरापर्यंत या भागात विशेष रस्ता अनुदान योजनेंतर्गत दहा लक्ष रुपयाच्या रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण आणि नाली कामाचे उद्घाटन दि. २९ जुन रविवार रोजी सायंकाळी साडेपाच वाजता युवा नेतृत्व रणवीर काका पंडित यांच्या हस्ते संपन्न झाले.



यावेळी युवा नेते रणवीर पंडित म्हणाले की, माजी आमदार अमरसिंह पंडित व विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून गेवराई शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून शहरात विविध ठिकाणी विकासाची कामे केली जात आहेत. विशेष रस्ता अनुदान योजनेंतर्गत प्रभाग क्रमांक सात या भागातील अंतर्गत रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण व नाली कामाचे उद्घाटन झाल्याने कामाला सुरुवात झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून आपल्याकडे सत्ता नसल्यामुळे आपण विकास कामे करू शकलो नाहीत पण विधानसभेच्या रणांगणात आपण विजय झाल्याने आपल्याला विकास कामाची संधी मिळाली आहे त्यांचा फायदा गेवराई शहराच्या विकासासाठी यापुढे करणार आहोत सत्ता नसल्यावर कुठल्याही कामे पूर्ण होण्यास विलंब लागत होता पण् आता पालकमंत्री अजितदादा आणि आमदार विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून आपण शहरात विकास कामाचा अनुशेष भरून काढत आहोत यांचा मला मनापासुन आनंद झाला. शिवछत्र परिवार कधी मागे हटणार नाही असे प्रतिपादन रणवीर काका पंडित यांनी केले आहे. यावेळी नाईक वस्ती येथील नागरिक उपस्थित होते.

## बीड नगरपरिषदच्या विरोधात मनसेचे अनोखे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

शहरातील जुना बाजार कोतवाली वेस ते बलभीम चौक, कारंजा रोड, राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याचा काम तात्काळ सुरू करण्यात यावा या मागणीसाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगरपरिषद च्या विरोधात जुना बाजार येथील रस्त्यावरील खड्ड्यात बेशरम चे झाड लावून अनोखे आंदोलन करण्यात आले.

असे की, बीड शहराच्या मध्ये भागातून जाणाऱ्या शहरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असणारा जुना बाजार कोतवाली वेस ते बलभीम चौक, कारंजा रोड राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्त्यावर मोठ - मोठाले खड्डे पडून सामान्य नागरिकांना रहदारीसाठी मोठा अडथळा येत आहे. शहरातील हा प्रमुख व्यापारी मार्ग असून दररोज या ठिकाणी जिल्हाभरातून नागरिक विविध व्यवसायाच्या निमित्ताने येतात तसेच अनेक दिवसापासून रस्त्याच्या कामाला प्रलंबित ठेवलेला असल्याने येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.



बीड नगर परिषदेने येथील नागरिकांची पिळवणूक थांबून तात्काळ रस्त्याचा काम सुरू करावा अशी मागणी करत आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वार्षताई जगदाळे (महिला आघाडी राज्य उपाध्यक्ष) यांच्या प्रमुख उपस्थितीत मनसे बीड शहराध्यक्ष पठाण अमरजान यांच्या नेतृत्वाखाली जुना बाजार येथील रस्त्यावरील खड्ड्यात बेशरम चे झाड लावून बीड नगरपरिषदेच्या विरोधात तीव्र व जोरदार घोषणाबाजी करत अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी मनसेचे सदाशिव बिडवे (जिल्हा उपाध्यक्ष), आशा कुटे (बीड जिल्हाध्यक्ष), कल्पना कवठेकर (जिल्हा उपाध्यक्ष), सुरेखा ढाकणे, स्वराज मस्के, मोहम्मद सलीम, अब्दुल अजीम, तारेख चाऊस, रफिक शेख, मोमीन खादीर सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

## आ. संदीप भैय्या विजय पवारला साथ देऊन स्वत:चे

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन बीड शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेल्या दुर्दैवी घटनेबाबत माहिती दिली. तसेच या प्रकरणात सर्व पालक संशय व्यक्त करत आहेत त्याप्रमाणे आणखी काही मुलींवर देखील असे अत्याचार झाले असून, ही सर्व प्रकरणे समोर येणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आरोपी, त्यांना मदत करून पाठीशी घालणारे याची सखोल चौकशी केली जावी व दोषींना कठोर शिक्षा दिली जावी, यासाठी बीड जिल्ह्याबाहेर सेवेत असलेल्या अनुभवी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक नेमून या संपूर्ण प्रकरणाचा तपास केला जावा अशी आग्रही मागणी केली. मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले असून, बीड प्रकरणातील संपूर्ण सत्य नक्कीच बाहेर येईल, असा विश्वास आहे. बीड सह राज्यात सर्वच ठिकाणी खाजगी कोचिंग क्लासेस चालकांना फी मर्यादा, वसुलीची पद्धत, विद्यार्थ्यांची सुरक्षा याबाबत नैतिक व कायदेशीर संहिता असावी, यादृष्टीने एक व्यापक नियमावली शासनाने निर्गमित करावी, अशीही मागणी यावेळी केली असून याबाबतही सरकार सकारात्मक निर्णय घेईल, असे आश्वासन मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहे, असं धनंजय मुंडे यांनी म्हटलं.

### बीड हादरले! अल्पवयीन विद्यार्थिनीवर १० महिने

**आरोपींना अटक, दोन दिवसांची पोलिस कोठडी**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी प्राध्यापक विजय पवार आणि प्रशांत खाटोकर यांना अटक केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने त्यांना वेगवेगळ्या ठिकाणाहून ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

**मुख्याध्यापिका आणि ड्रायव्हर संशयाच्या घेऱ्यात**

या प्रकरणात ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका आरोरा मॅडम आणि एका ड्रायव्हरने आरोपींना पळून जाण्यास मदत केल्याचा संशय व्यक्त होत आहे. त्यांच्या मोबाईल कॉलिंग रेकॉर्डची (उ‌‌ऊ) तपासणी करून त्यांनाही सहआरोपी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कोणतीही दयामाया न दाखवता कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**शिक्षकाच्या भूमिकेचा गैरवापर आणि कायद्याची प्रक्रिया**

आरोपी प्राध्यापक विजय पवार आणि प्रशांत खाटोकर यांनी शिक्षकाच्या भूमिकेचा गंभीर गैरवापर केला आहे. विद्यार्थ्यांचे संरक्षण करण्याची आणि त्यांना सुरक्षित वातावरण देण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. मात्र, या घटनेत शिक्षकांनीच विद्यार्थिनीचा लैंगिक छळ करून तिचा विश्वासघात केला आहे. १० महिन्यांपासून हा छळ सुरू होता, हे आरोपींच्या पूर्वनियोजित आणि सातत्यपूर्ण गुन्हेगारी प्रवृत्तीचे द्योतक आहे. विद्यार्थिनीचे अश्लील फोटो काढणे हे गुन्हेगारी कट आणि लैंगिक शोषणाचे अत्यंत गंभीर स्वरूप दर्शवते.

आरोपींना अटक झाली असून, त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यानंतर त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवले जाईल. यानंतर, पोलिसांना वेळेत आरोपपत्र दाखल करावे लागेल. पॉक्सो प्रकरणांमध्ये जलद न्याय मिळण्याची अपेक्षा असल्याने खटल्याची सुनावणी जलदगती न्यायालयात चालवली जाण्याची शक्यता आहे.

**कठोर कारवाईची मागणी आणि भविष्यातील उपाययोजना**

तपास यंत्रणांनी नि:पक्षपातीपणे आणि तातडीने कारवाई करणे अपेक्षित आहे. समाजाचा कायद्यावरील विश्वास कायम ठेवण्यासाठी, दोषींना कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. या घटनेमुळे शिक्षण संस्थांमधील बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकारामुळे मुला-मुलींना कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षणासाठी पाठवावे की नाही, असा गंभीर प्रश्न पालकांच्या मनात निर्माण झाला आहे. आपल्या पाल्यांच्या सुरक्षिततेबाबतची चिंता त्यांना सतावत आहे. सरकारने खाजगी कोचिंग क्लासेसच्या नियमनासाठी कठोर कायदे करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटनांना आळा घालता येईल.


डॉ. ऋषिकेश विघ्ने यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले की, या प्रकरणातून केवळ पीडितेला न्याय मिळवणे हेच नव्हे, तर समाजात एक स्पष्ट संदेश देणे आवश्यक आहे की, बालकांवरील लैंगिक अत्याचार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत आणि दोषींना कायद्यानुसार कठोरतम शिक्षा मिळेल. ही घटना समाजातील नैतिक मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी व्यापक जनजागृती आणि कठोर कायदेशीर अंमलबजावणीची गरज आहे.

# ‘नीट’ मार्गावर चालताना..!

काही दिवसांपूर्वी बीड शहरातील उमाकिरण एज्युकेशन हब ला सील लावण्यात आल्याने तेथे प्रवेश घेतलेल्या नीट च्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे काय? सील उघडेपर्यंत तेथील विद्यार्थ्यांना ज्ञानदान कोण करणार? येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्यासाठी एखादे महाविद्यालय किंवा शिक्षण विभाग पुढे येईल का? तेथे घडलेल्या प्रकरणाचा तपास जलद गतीने होईल का? विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित पाहून या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लवकर लावण्यासाठी जलद गती न्यायालयात हे प्रकरण चालविले जाईल का? आरोप असलेले तेथील दोन्ही प्राध्यापक दोषी आढळले तर त्यांना न्यायालयात कोणती शिक्षा होईल? असे एक ना अनेक प्रश्न विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांच्या मनात उभे ठाकले आहेत.

**उमाकिरण सारखे व्यावसायिक खाजगी शैक्षणिक हब का उभे राहिले?**

जेव्हापासून शासनाने डॉक्टरकीचे शिक्षण घेण्याकरिता नीट परीक्षा उत्तम गुणाने उत्तीर्ण होणे अनिवार्य केले, तेव्हापासून उमाकिरण आणि त्यासारखे अनेक व्यावसायिक खाजगी शैक्षणिक हब उभे राहिले. अशाप्रकारे पैसे घेऊन शिक्षण विकणाऱ्या खाजगी शैक्षणिक हब वाल्यांनी सुरुवातीला पालकांना परवडेल असे दर लावून आपापल्या शिकवण्या सुरू केल्या, परंतु जसजसे दिवस पुढे गेले तसतसे असे हब चालविणाऱ्या धुरीनांनी हळूहळू अव्वाच्या सव्वा रक्कम आकारून ती पालकांकडून वसूल करण्यास सुरुवात केली. म्हणून आर्थिक दृष्ट्या असे खाजगी शैक्षणिक हब चालविणारे गब्बर होत गेले. त्यांचा आर्थिक पाया नव्हे तर इमारती एवढ्या मजबूत आणि उंच झाल्या की ते कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाच्या नेत्यांना जवळ करून समाजात आपली प्रतिष्ठा वाढवू लागले. एवढेच नव्हे तर राजकारण्यांना निवडणुकीत आर्थिक रसद पुरवित असल्याचेही म्हटले जात आहे. शिवाय अनेक पक्षांच्या मोठमोठ्या नेत्यांच्या प्रचंड मोठमोठ्या सभेमध्ये संपूर्ण सभेच्या सूत्रसंचालनाचे काम देखील मोठ्या नेत्यांच्या व्यासपीठावरून यातील काही प्राध्यापक करू लागले होते. या सर्व कारणांमुळे यांच्या खाजगी शैक्षणिक हब मध्ये नेमके काय चालले आहे? कसे चालले आहे? यांच्याकडे पारंगत प्राध्यापक आहेत का? जे प्राध्यापक आहेत त्यांची पार्श्वभूमी कशी आहे? ते येथे येण्या अगोदर काय करत होते? त्यांचे शैक्षणिक योगदान कसे व किती आहे? ते विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याच्या लायकीचे आहेत की नाही? येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना किती फी आकारावी? वगैरे प्रश्नांकडे ना शिक्षण विभागाने, ना प्रशासनाने ना शासनाने लक्ष दिले. यामुळे आर्थिक दृष्ट्या मातब्बर आणि गब्बर झालेले खाजगी शैक्षणिक हब च्या काही संचालकांना माज सुद्धा चढला. यामुळे ते कुणालाही जुमानीनासे झाले. याचाच परिपाक म्हणून फक्त घसघशीत रक्कम घेऊन येणारे विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनाच असे खाजगी शैक्षणिक हब चालविणारे प्रवेश देऊ लागले. यांच्याकडे घाम गाळून नाममात्र दाम मिळविणाऱ्या पालकांची मुले-मुली शोधूनही सापडत नाहीत. त्यामागचे कारण हेच आहे. गडगंज मालमत्ता असणाऱ्या पालकांकडून मनमानी प्रमाणे पैसे उकडून कमी वेळेत आणि कमी श्रमात या खाजगी शैक्षणिक हब वाल्यांनी बक्कळ माया जमविली. मात्र अशाप्रकारे जवळ आलेला पैसा यांचे मन-मस्तिष्क खराब करून गेला. हे उमाकिरण चा



सर्वेसर्वा असलेला प्राध्यापक विजय पवार आणि त्याचा सहप्राध्यापक खाटोकर यांनी अल्पवयीन विद्यार्थिनी सोबत केलेल्या गैरकृत्याची तक्रार जेव्हा पीडित विद्यार्थिनीने आपल्या पालकांसोबत शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे दिली, त्यानंतर पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद झाल्याने समाजासमोर आले. आणि याची सर्व दूर जाहीर वाच्यता मोठ्या प्रमाणात झाली. अनेक सामाजिक संघटनांनी या घटनेत दोषी असलेल्यांना कडक शासन झाले पाहिजे अशी मागणी लावून धरली आहे. यापुढे आता विजय पवार आणि खाटोकर यांचे पोलीस कारवाई आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतर काय होईल ते होईल परंतु ज्या अल्पवयीन विद्यार्थिनीमुळे हे प्रकरण समोर आले, तिचे पुढे काय होईल? या विद्यार्थिनी शिवाय अजूनही अन्य कोणत्या विद्यार्थिनींवर या खाजगी शैक्षणिक हब मध्ये अशाप्रकारे अनैतिक कृत्य घडले आहे काय? प्रत्येक विषयासाठी हजारो रुपये भरून या खाजगी शैक्षणिक हब मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे काय? या प्रश्नाने विद्यार्थ्यांसह पालकांचीही झोप उडाली आहे. येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता आता कोणते एखादे महाविद्यालय किंवा शिक्षण विभाग पुढे येतो का? हे पाहणे म्हणजे या दोघांची परीक्षा घेण्यासारखेच आहे. या परीक्षेसाठी या दोन्ही पैकी कोण बसतोय? बसल्यास पास होणार का? हे पाहणेही औत्सुक्याचे ठरणार आहे.

**ही समाजातील खूप मोठी शोकांतिका!**

खाजगी शैक्षणिक हब मधील शिक्षक जिथे एक-एका विषयाला वर्षाकाठी हजारो रुपये आकारून शिकवतात. तेच शिक्षण प्रत्येक महाविद्यालयातील दरमहा प्रत्येकी दोन ते तीन लाख रुपये वेतन घेणारे प्राध्यापक का शिकवू शकत नाही? असा प्रश्न ना कधी शिक्षण विभागाला पडतो, ना प्रशासनाला, ना शासनाला आणि सरते शेवटी पालक व विद्यार्थ्यांना सुद्धा. ही समाजातील खूप मोठी शोकांतिका आहे.

**नीट च्या वेडापायी**

जेव्हापासून नीट नावाचे खुळ पालक आणि विद्यार्थ्यांच्या डोक्यात फिट बसविण्यात आले तेव्हापासून या नीट मुळे अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी एक दोन नव्हे तर चार-चार आणि पाच-पाच वेळा याची परीक्षा देत आहेत. यामुळे त्यांचे वय वाढत जाते, ते डिप्रेशन मध्ये जातात. त्यांचे पालक सुद्धा डिप्रेशन मध्ये जातात. लाखोंचा खर्चही होतो आणि कमी गुण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी डॉक्टर सुद्धा होत नाही आणि नीट च्या नादी लागले म्हणून फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी शिवाय अन्य विषयात विद्यार्थी कच्चे राहतात. म्हणून ते इतर क्षेत्रात सुद्धा अपयशी ठरतात. अनेक विद्यार्थी नीट मध्ये कमी गुण मिळाले किंवा नापास झाले म्हणून आत्महत्या सुद्धा करतात. एवढेच नाहीतर काही दिवसांपूर्वीच एका शिक्षकाच्या मुलीने नीट मध्ये कमी गुण घेतल्याने त्या शिक्षक पित्याने पोटच्या मुलीला एवढी बेदरकारपणे मारहाण केली की त्यात तिचा जीव गेला ही घटना ताजी आहे. याशिवाय अनेक घटना अशा आहेत, ज्या निव्वळ आणि निव्वळ नीट पायी घडलेल्या आहेत.

**नीटची किटकिट बंद व्हायलाच हवी**

नीट येण्याअगोदर विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उच्च शिक्षण घेऊन डॉक्टर होत नव्हते का? तर या प्रश्नाचे उत्तर आहे होत होते. उलट पूर्वीचे एमबीबीएस डॉक्टर हे रुग्णाची नाडी, डोळे आणि जिभेचा रंग पाहून रुग्णाला नेमका कोणता रोग झालाय हे ओळखून उपचार करायचे. परंतु आज नीट सारख्या फालतू आणि भंकस परीक्षा देऊन एम.डी., एम.एस., गायनाकॉलॉजिस्ट वगैरे सारख्या डिग्र्या मिळवून डॉक्टर झालेले, रुग्ण आल्यानंतर त्याच्या रक्त लघवी आणि अन्य इतर भरमसाठ तपासण्यात केल्याशिवाय रुग्णाला नेमका कोणता रोग झाला, याचे निदान करत नाहीत किंवा उपचारही देत नाही. सर्व तपासण्या झाल्यानंतरच रुग्णांवर उपचार करतात. मग असे कुचकामी डॉक्टर तयार करणारी नीट परीक्षा हवीच कशाला? या नीटची किटकिट कायमस्वरूपी बंद व्हायलाच हवी.

**नीट खाजगी यंत्रणेकडून घेण्यात येणारी परीक्षा**

नीट परीक्षेविषयी विचार केला तर हसावे कि रडावे हेच कळत नाही. कारण ही परीक्षा काही शासनाकडून घेण्यात येत नाही. जसे शासनाकडून यूपीएससी, एमपीएससी या परीक्षा घेण्यात येतात. त्यांचा आपला एक विशेष दर्जा असतो, तसे या नीट परीक्षेचे नाही. ही परीक्षा घेण्याचा अधिकार भलेही शासनाने दिला असला तरी ही परीक्षा मात्र खाजगी यंत्रणेकडून घेण्यात येते आणि खाजगी यंत्रणा म्हणजे त्यात किती सत्यता आणि किती असत्य असते हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

**नीट च्या परीक्षेत चालले काय?**

काही वर्षांपूर्वी बीड शहरातच नीट मध्ये चांगले गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या काही विद्यार्थ्यांचे व ते शिकत असलेल्या खाजगी शैक्षणिक हब चालकांचे पितळ उघडे पडले होते. ज्यात या खाजगी शिक्षकांनी अक्षरश: एकेका विद्यार्थ्यासाठी लाखो रुपयांची उधळपट्टी करून विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम गुण मिळवून उत्तीर्ण केल्याचे समोर आले होते. एवढे मोठे प्रकरण गाजून देखील आपल्या मुला-मुलींसाठी आंधळे होऊन व बुद्धी गहाण ठेवून बसलेल्या गडगंज पैसा असलेल्या पालकांच्या डोक्यात व डोळ्यांमध्ये प्रकाश पडला नाही. आता उमाकिरण मध्ये घडलेल्या या घटनेनंतर तरी प्रकाश पडेल, अशी आशा करायला हरकत नाही.

**लेखन - एस.एम.युसूफ**
**(मुक्तपत्रकार)**
**आसेफ़नगर, बीड**
**संपर्क - ९०२१ ०२ ३१२१**

# नवनीत कावत साहेब, तुम्ही फक्त हाय-प्रोफाइल गुन्ह्यांचाच शोध लावणार असाल तर सामान्य नागरिकांनी दाद कुणाला मागायची?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यास आता खमक्या पोलीस अधिकारी येऊन सुद्धा, विविध प्रकारचे गुन्हे, घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. बीडला जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून श्री. नवनीत कावत हे खमके अधिकारी रुजू झाले असले तरी मात्र हाय -प्रोफाइल गुन्ह्याचा शोध लावला जातोय किंवा त्याच गुन्ह्यात तत्परतेने गुन्हा नोंद होऊन कारवाई सुरु झाल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. बीड जिल्ह्यातील फक्त हाय -प्रोफाइल गुन्ह्यांसाठी फक्त पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांना रुजू करून



घेतले आहे असा समज सध्या सामान्य नागरिकांच्या मनात बळाऊ लागला आहे. घटना आणी गुन्हे हे हाय - प्रोफाइल अथवा उच्चभ्रू नागरिकांचेच घडत नाहीत तर सर्वसामान्य कष्टकरी लोकांच्या कुटुंबात देखील गुन्हे होत असतात. घटना आहे नेकनूर पोलीस स्टेशन हद्दीतल्या देवी बाभुळगाव या गावची.

या गावात सचिन काशिनाथ ढवारे नामक मागासवर्गीय समाजातला तरुण मोलमजुरी करून राहतो. त्याची पत्नी नामे पूजा ढवारे /साळवे ही दि.१० जून रोजी तिच्या वडिलांसोबत म्हणजे बाबुराव साळवे यांच्या सोबत तिच्या माहेरी म्हणजे गोवर्धन हिवरा ता. परळी. जि बीड या ठिकाणी जाण्यासाठी देवी बाभुळगाव वरून बीड या ठिकाणे गेली. पूजा ढवारे/ साळवे ही बीडच्या बस स्थानकात पोहचताच आपल्या वडिलांना बाथरूमला जाऊन येते असं सांगून गेली. मात्र बराच वेळ ती माघारी न आल्यामुळे पुजाचे वडील बाबुराव गंगाराम साळवे यांनी संपूर्ण बस स्थानक परिसर पुजाच्या शोधार्थ पिंजून काढला. मात्र पूजा काही त्यांना मिळून आली नाही याबाबत पुजाचे वडील बाबुराव गंगाराम साळवे यांनी बीडच्या शिवाजीनगर पोलीस स्टेशनला जाऊन आपली मुलगी पूजा ही अशा अशा प्रकारे गायब झाली आहे अशी रीतसर तक्रार दाखल केली आहे. परंतु शिवाजीनगर पोलिसांनी पूजा ढवारे / साळवे हिची मिस्सिंग ची तक्रार फक्त कागदोपत्री नोंद करून घेतली परंतु तीचा कसलाच शोध शिवाजीनगर पोलिसांनी घेतला नाही.तश्यात पूजा ढवारे / साबळे चा पती सचिन काशिनाथ ढवारे यास आपल्या पत्नीला पूजाला देवी बाभुळगाव याच गावात राहणाऱ्या अमरसिंह देविदास सालपे हाच पळवून घेऊन गेला आहे अशी माहिती मिळाली.पूजा ढवारे /साळवे ही आपल्या वडिलांसोबत माहेरी जाण्यासाठी निघाली खरी, परंतु बीड बस स्थानकात पोहचताच आपल्या वडिलांना ती बाथरूमला जाऊन येते असं सांगून अमरसिंह देविदास सालपे याच्या सोबत फरार झाली असल्याची खात्रीदायक माहिती पती सचिन ढवारे यास मिळाली असता. पुजाचा पती सचिन ढवारे सचिन ढवारे हा याबाबतची तक्रार दाखल करणार होता. मात्र सचिन ढवारे ची पत्नी मीच पळवून आणली आहे आणी तो आता माझ्यावर गुन्हा दाखल करणार आहे. अशी कुणकुण अमरसिंह सालपे यास लागली असता. अमरसींह सालपे हा पूजा चा पती सचिन ढवारे यास फोन करून आई - बहिणीवर अश्लील शिव्या देत होता आणी तुझी बायको मीच पळवून आणली आहे जा कुठे जाऊन केस करायची ते कर अशा धमक्या देत होता. दुसरी महत्ववाची गोष्ट ही कि, देवी बाभुळगाव या गावात मागासवर्गीय समाजाची कमी घरे आहेत त्यामुळे अमरसीह सालपे हा सचिन ढवारे यास जातीवाचक शिव्या देऊन तूम्ही महारं आम्हा पाटलाचं काय वाकडं करू शकतात, गावातून हाकलून देऊ तुम्हाला अशा धमक्या देतो आहे. आणी माझ्यावर जर अट्रासिटी चा गुन्हा दाखल जर केलास तर तुला आणी तूझ्या लेकरांना जिवंत सोडणार नाही असा दम तो देतो आहे. मुळात अमरसींह सालपे याचे रेकॉर्ड तपासले असता त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे हे उघड होत आहे.आपल्या पत्नीला पळवून नेले वरून तोच व्यक्ती आपल्याला आई बहिणीवर अश्लील शिव्या देतो आहे. त्यामुळे घाबरून सचिन ढवारे यांनी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांच्याकडे समक्ष जाऊन या सर्व प्रकरणाची तक्रार २० जून रोजी दाखल केली आहे. मात्र या तक्रारी नंतर तर अमरसिंह सालपे हा जास्तच चिडून जाऊन सचिन ढवारे यास वारंवार फोन करून धमक्या, आई बहिणीवर शिव्या, आणी जातीवाचक शिव्या देऊन जीवे मारून टाकतो अशा धमक्या वारंवार देतो आहे. बीड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांना समक्ष भेटून जर फिर्यादी आपल्या सोबत घडलेला प्रकार कथन करून तक्रार रुपी निवेदन देत असेल तरीही एका मागासवर्गीय समाजातील गरीब असणाऱ्या सचिन ढवारे याच्या पत्नीचा शोध बीड पोलिसांकडुन घेतला जात नाही ही शरमेचीबाब म्हणावी लागेल, अमरसिंह सालपे हा त्याच्या ज्या मोबाईल नंबर वरून फोन करून सचिन ढवारे यास अजूनही धमक्या देत आहे त्याचा शोध तांत्रिक रित्या घेऊन त्याला अटक केली जात नसेल तर मग, बीड जिल्हा पोलीस अधीक्षक हे फक्त हाय -प्रोफाइल असणाऱ्या नागरिकांच्या गुन्ह्याचा शोध घेण्याकरीताच रुजू झाले आहेत काय? किंवा तेवढ्या पुरतच गृह विभागाने त्यांना बीड मध्ये आणले आहे काय? जर असे असेल तर मग सर्वसामान्य असणाऱ्या नागरिकांनी आपल्यावर झालेल्या किंवा घडवून आणल्या जात असलेल्या अन्यायाची दाद नेमकी आता मागायची कुणाकडे? या गरीब, मागासवर्गीय नागरिकांचा वाली तरी नेमका कोण? असा प्रश्न आता बीड जिल्ह्यातील सामान्य नागरिकांना पडला आहे आणी शेवटी एकच प्रश्न पडला आहे तो म्हणजे सचिन ढवारे याला बीड जिल्हा पोलीस अधीक्षक खरच न्याय देतील काय?



## शाळेच्या अविस्मरणीय स्मृतीची शिदोरी आयुष्यभर ऊर्जा देणारी ठरणार आहे : आरदडे

परतूर । प्रतिनिधी

शाळेतील विद्यार्थी आणि सहकारी शिक्षकांशी ऋणानुबंधाच्या नात्याने मन गहिवरून गेलं आहे. एक शिक्षक म्हणून माझ्या कारकिर्दीत, मी तुमच्या सर्वांकडून खूप काही शिकलो. तुमच्यापैकी काहींनी मला योग्य मार्गदर्शन केले, तर काहींनी मला प्रोत्साहन दिले. शाळेच्या अविस्मरणीय स्मृती माझ्या कायम मनात घर करून राहतील सेवानिवृत्ती नंतरचे जीवन जगण्यासाठी शाळेतील आनंददायी अविस्मरणीय स्मृतीची शिदोरी आयुष्यभर ऊर्जा देणारी ठरणार आहे, असे भावनिक बोल सेवानिवृतीचा निरोप घेताना सत्कारमूर्ती ज्येष्ठ शिक्षक अशोक आरदडे सर यांनी केले.

परतूर तालुक्यातील आनंदवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ज्येष्ठ शिक्षक अशोक आरदडे सर निरंतर ३३ वर्षांच्या समर्पित सेवेनंतर नियत वयोमानानुसार आज सेवानिवृत होत आहेत यानिमित्ताने आनंदवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ज्येष्ठ शिक्षक अशोक आरदडे सर यांचा सेवानिवृत्ती निरोप समारंभाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक गणेश अंबुरे, ज्येष्ठ शिक्षक विजयकुमार कदम, शशांक पाठक, संतोष रनबावळे, नामदेव भोसले, श्रीमती आरसुळ यू.एच.यांची उपस्थिती होती.

दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक गणेश अंबुरे सर म्हटले की,अशोक आरदडे सर यांनी कर्तव्यावर असताना आपल्या कार्यकाळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कठोर परिश्रम घेतले आहे जीवनात निस्वार्थ भावनेने विद्यार्थ्यांना ज्ञानदान केले. शिस्त, मेहनत, सचोटी आणि आत्मविश्वास या मूल्यांचे बीज प्रत्येक विद्यार्थ्याच्या हृदयात रुजवले. त्यांनी आम्हाला जीवनातील महत्त्वाचे धडे शिकवले आता आपण निवृत्त होत आहात, आम्हा सर्वांना आपली आठवण नेहमी आमच्या सोबत राहील. आता वेळ आहे की आपण आपल्या कुटुंबासोबत आणि मित्रांसोबत आनंदाचे क्षण घालवावेत. आपल्या निवृत्तीच्या जीवनात केवळ सुख आणि समाधान आपल्याला लाभो ही सदिच्छा मुख्याध्यापक गणेश अंबुरे यांनी शाळेच्या वतीने बोलतांना व्यक्त केली.

## महाराष्ट्र शासनाचा समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल राजू वंजारे यांचा जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने यथोचित सत्कार

बीड । प्रतिनिधी

गतवर्षी महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार आणि यावर्षी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे उत्कृष्ट संस्थेचा पुरस्कार निसर्ग सेवाभावी संस्थेचे संस्थापक येळंबघाट येथील रहिवासी असलेले जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात निस्वार्थ भावनेने समाजकार्यासाठी स्वतःला समर्पित केलेले राजू वंजारे यांचा राज्य सरकारने एक लक्ष रुपये देऊन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान केला. सलग दोन वर्ष मिळालेल्या या पुरस्कारामुळे बीड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रात उंचावल्याने जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करताना बीडचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, होम डिवायएसपी उमाकांत कस्तुरे, महापारेषण बीडचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी, सचिव वैभव स्वामी यांच्यासह व्यासपीठावरील मान्यवर दिसत आहेत.



## रानमळाच्या राजमाता जिजाऊ विद्यालयात शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी केले वृक्षारोपण

गेवराई । प्रतिनिधी

शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित राजमाता जिजाऊ विद्यालय रानमळा या शाळेत दिनांक ३० जून २०२५ रोजी शाळेच्या प्रांगणात शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. ३० जून हा लघुग्रह दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून रानमळा येथील राजमाता जिजाऊ विद्यालयात प्रशासकीय अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रमोद देसले यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले.

यावेळी बोलताना मुख्याध्यापक प्रमोद देसले म्हणाले की, आज केलेले वृक्षारोपण भावी पिढीला स्वच्छ ऑक्सिजन मिळण्यासाठी उपयोगी ठरतात भरमसाठ वृक्षतोड होत असताना वृक्ष लागवड करणे ही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने आयुष्यात एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करणे गरजेचे आहे. प्रदूषण रोखण्यासाठी आणि वातावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड ही काळाची गरज असल्याचेही ते म्हणाले. याप्रसंगी दिनकर शिंदे, मुकुंद वाघमारे, अभिमान डोंगरदिवे, आप्पासाहेब शिंदे, प्रल्हाद कोकाट, सिद्धेश्वर शेजुळ, बाबासाहेब हिंगे, मदन जाधव, काशिनाथ भोले, उमेश हादगुले यांच्यासह विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



## आम आदमी पार्टीच्या आष्टी तालुका उपाध्यक्षपदी डॉ. दीपक गोल्हार यांची निवड

आष्टी । प्रतिनिधी



दादेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व सतत लोकांच्या सुखदु:खात सामील असणारे डॉक्टर दीपक गोल्हार यांची नुकतीच आम आदमी पार्टीच्या आष्टी तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांचं कार्य आज पर्यंत सामाजिक क्षेत्रात उल्लेखनी असल्याने त्यांना या पदाची जबाबदारी देण्यात आली. त्यांना या पदाचे अधिकृत पत्र आम आदमी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष येडे साहेब यांनी नुकतच नियुक्तीपत्र दिले. संघटक मंत्री मुकुंदा कोल्हे यांचा या आम आदमी पार्टीत फार मोठे योगदान आहे त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन वर्ष होत आहे.

## मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धेत सारणी (सां) येथील श्री. विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय प्रथम

केज । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ मध्ये केज तालुक्यातून सारणी (सांगवी) येथिल श्री. विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला होता. शाळेला ३ लाखांचे पारितोषिक मिळाले होते. या पारितोषिकाचा धनादेशाचे वितरणाचा कार्यक्रम दि.२३ जुन रोजी पंचायत समिती कार्यालय येथे पार पडला.

महाराष्ट्र शासनाच्या वतिने घेण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ ची केज तालुकास्तरीय स्पर्धा तहसिलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी यांच्या नेतृत्वात पार पडली. स्पर्धेत शाळेतील भौतिक सुविधा, विद्यार्थी गुणवत्ता, शाळेतील स्वच्छता आदी बाबींना धरून शाळेची निवड करण्यात येते. तालुकास्तरीय झालेल्या स्पर्धेत सारणी (सांगवी) येथिल श्री. विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकवला आसून शाळेला ३ लाखांचे पारितोषिक मिळाले आहे. या धनादेशाचे वितरण दि.२४ जुन रोजी गटविकास अधिकारी श्रीमती दिवाने, गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुनिल केंद्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य सचिन हांगे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



## सेवा, संस्कार आणि समर्पण - अभाविप व जिज्ञासा आष्टीचा समाजाभिमुख उपक्रम

आष्टी । प्रतिनिधी

जिज्ञासा व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, आष्टी शाखेच्या वतीने श्रीराम मंदिर, आष्टी येथे अमळनेरकर महाराज यांच्या दिंडीत सहभागी होत पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणाऱ्या वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी व औषध वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ग्रामीण रुग्णालय, आष्टी व महेश आयुर्वेदिक महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले.

पायी प्रवासामुळे वारकऱ्यांना थकवा, रक्तदाब वाढणे, अंगदुखी, पायाला फोड येणे यांसारख्या त्रासांना सामोरे जावे लागते. ही गरज लक्षात घेता अभाविपच्या कार्यकर्त्यांनी या उपक्रमाची योजना आखली होती. शिबिरात बीपी तपासणी, अंगदुखीवर औषधे, गोळ्यांचे वाटप व प्राथमिक उपचार करण्यात आले. विशेष म्हणजे या शिबिरात एकूण २६५ भाविक भक्तांची तपासणी करण्यात आली. महिलांसह ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने या सेवेचा लाभ घेतला. वैद्यकीय पथकात महिला डॉक्टर व स्वयंसेवकांनी विशेष सहभाग घेतला. रांगेत उभ्या असलेल्या भाविकांनी समाधान व्यक्त करत अभाविपच्या उपक्रमाचे कौतुक केले. सेवा, संस्कार आणि राष्ट्रनिर्माण या घोषवाक्याशी सुसंगत असा हा उपक्रम वारकऱ्यांच्या सेवेसाठी आदर्श ठरला आहे. या वेळी अभाविप आष्टी शहर सहमंत्री अजून जोशी, शिवराज आजबे, डॉ. जयश्री टेकाळे, वैभव येडे (अधिपरिचारक, ग्रामीण रुग्णालय), सिद्धांत दानी आदी उपस्थित होते.



## कोचिंग क्लासेसचे लाखों-कोट्यवधींचे साम्राज्य? यांची सखोल चौकशी करण्यात यावी : शेख इमरोज शरीफ

बीड । प्रतिनिधी

शहरातील गल्लीबोळांत दिवसेंदिवस कोचिंग क्लासेसचा सुळसुळाट वाढत चालला आहे. काही ठिकाणी शिक्षणाची गुणवत्ता असली तरी बहुसंख्य क्लासेसमध्ये ना शिस्त आहे, ना पारदर्शकता आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुला-मुलींच्या सुरक्षेची कोणतीही खात्री नाही. आज एखादी छेडछाड झाली आहे पण जर उद्या एखादी बलात्कारासारखी अत्यंत भीषण घटना घडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार? का हे प्रकरण जे काही लोक दाबण्याचा प्रयत्न करत आहेत ते याची जबाबदारी घेतील का? पण अशा प्रकारांवर जर आजच आवाज उठवला नाही तर उद्या भविष्यात अशा घटना घडू शकतात. प्रशासन आणि शिक्षण विभाग या गोष्टींकडे डोळेझाक करत आहेत आणि हाच आपल्या शिक्षण व्यवस्थेचा सगळ्यात मोठा अपमान आहे.



कोचिंग क्लासेसचा अनियंत्रित विस्ताराला कोण जबाबदार? या कोचिंग क्लासेसमध्ये हजारोंच्या फी घेतल्या जातात, भल्यामोठ्या जाहिराती, बॅनर्स लावले जातात. पण वर्गखोल्यांमध्ये मुलींची सुरक्षा आहे का? शिक्षक पात्र आहेत का? कोचिंग सेंटर चालवायला परवानगी आहे का? यावर कोणीच बोलत नाही. किंवा तपासणीही करणे गरजेचे समजत नाही. अनेक सरकारी व खाजगी शिक्षक स्वत:चे कोचिंग क्लासेस चालवत आहेत. शासकीय नोकरी करताना खासगी शिक्षण व्यवसाय करणे नैतिक व कायदेशीरदृष्ट्या कितपत योग्य आहे, हा प्रश्न आज गंभीर आहे.

शिक्षण विभाग, प्रशासन झोपेत? पण 'बीड न्यूज आप तक' जागं आहे! जे काम शिक्षण विभाग व प्रशासनाचं आहे. ते म्हणजे कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवणं, त्यांची परवानगी, तपासणी आणि मुली, मुलांच्या सुरक्षेची जबाबदारी हे काम आज कोणीच करताना दिसत नाही. म्हणूनच, बीडचा लोकप्रिय हिंदी न्यूज चॅनल 'बीड न्यूज आप तक' आता पुढाकार घेत आहे. शहरातील प्रत्येक कोचिंग क्लासला भेट दिली जाणार आहे तिथली सुविधा, सुरक्षा, शिकवण्याची पद्धत, फी, माणुसकीची वागणूक आणि हे सर्व वास्तव जनतेसमोर आणलं जाईल. 'बीड न्यूज आप तक' च्या माध्यमातून आम्ही प्रशासना समोरही याचे व्हिज्युअल पुरावे, मुलाखती, प्रतिक्रिया दाखवणार आहोत. जर शिक्षकच क्लास चालवत असतील आणि विद्यार्थी वर्गाऐवजी थेट कोचिंग क्लासमध्ये जात असतील तर मग शाळा आणि महाविद्यालयांची गरजच काय? आज कोचिंग क्लासेस कोट्यवधींचं उत्पन्न मिळवत आहेत, मोठ्या जाहिराती देतात, पण ना कर भरतात, ना कोणत्याही यंत्रणे कडे याचे उत्तर आहेत का?. हे उत्पन्न कसे आणि कुठून येते, याची पारदर्शकता आहे का?'बीड न्यूज आप तक' या चॅनलच्या माध्यमातून आम्ही या सगळ्या मुद्द्यांवर निष्पक्ष आणि जबाबदारीने काम करत आहोत. आमचा उद्देश कोणावर आरोप करणे नाही, पण विद्यार्थ्यांचं आणि समाजाचं भवितव्य वाचवणे हाच आहे. ही भूमिका आम्ही पुढेही ठामपणे बजावत राहू. तीही कुणाच्याही दबावाखाली न येता, अशी मागणी आजाद पत्रकार शेख इमरोज शरीफ यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे.

## शिवसेना वर्धापन दिनानिमित्त ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचा वर्धापन दिन यंदा सामाजिक उपक्रमाने साजरा करत शिवसैनिकांनी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवासात हातभार लावण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवसेना तालुका प्रमुख संतोष जाधव व सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने काल दि.२७ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान जि.प. शाळा महाजनवाडी, पिंपरणई, कोंबडवस्ती व लिंबागणेश गट या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना तालुका प्रमुख संतोष जाधव यांनी सांगितले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या संस्कारातून प्रेरणा घेत आम्ही शिवसैनिक समाजसेवेचं कार्य प्रामाणिकपणे पार पाडत आहोत. उपमुख्यमंत्री तथा शिवसेना प्रमुख एकनाथजी शिंदे व संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांची सामान्यांसाठीची तळमळ व महाराष्ट्राच्या हितासाठीची कार्यशैली आम्हाला नेहमीच प्रेरणादायी ठरली आहे. जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी संपूर्ण आयुष्य समाजकार्यात झोकून दिले आहे. त्यामुळे यावर्षी वर्धापन दिन फलकबाजी न करता समाजोपयोगी कार्य करून साजरा केला आहे.

यावेळी शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे, संचालक बाजार समिती तथा शिवसेना जिल्हा सह समन्वयक दीपक काळे, उपजिल्हा प्रमुख अमोल जाधव, अभिमन्यू घरत, आनंद पिंगळे, पंकज शेळके, विवेक सवाई यांच्यासह सर्व शिवसैनिक, शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसैनिकांनी शालेय विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन केलेल्या सहकार्याबद्दल शाळेतील शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी बीड जिल्हा शिवसेनेचे आभार मानले.



## बेलेश्वर संस्थानच्या श्रीगुरू ईश्वरभारती पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मठाधिपती प.पु.महंत महादेव भारती महाराज व ह.भ.प.शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या मार्गदर्शनात बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती पायी दिंडी सोहळा श्रीक्षेत्र पंढरपुरकडे आज दि.२९ रविवार रोजी सकाळी ११ वा.वारकऱ्यांनी टाळ मृदंगाच्या गजरात तल्लीन होत ग्यानबा तुकाराम गजर करत डोक्यावर तुळशीवृंदावन,हाती भगव्या पताका घेतलेले वारकरी अशा भक्तिमय वातावरणात आषाढी वारीसाठी रवाना झाली. दिंडीचे हे ३ रे वर्ष असुन पहिल्या वर्षी ४०० तर दुस-या वर्षी ११०० तर यावर्षी १५०० वारकरी सहभागी झाले होते.शेतशिवार हिरवेगार झाल्याने बळीराजा आनंदीत झाला असुन दिंडीत वारकऱ्यांची संख्या वाढली आहे. लिंबागणेश करांच्या वतीने आतिशबाजी करत सुवासिनींनी औक्षण करत मार्गावर ठिकठिकाणी रांगोळ्या काढत दिंडींचे जंगी स्वागत करण्यात आले. ईश्वरभारती मंदिरात महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. बालाघाटावरील बेलेश्वर संस्थान प्रसिद्ध असुन पायी दिंडी सोहळ्याचे हे तिसरे वर्षं आहे. आज सकाळी २९ जुन रविवार रोजी सकाळी ११ वाजता बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे दिंडी प्रस्थानावेळी पंचक्रोशीतील भाविक वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी लिंबागणेश ग्रामस्थांच्या वतीने ईश्वर भारती मंदिरात महाप्रसादाची सोय केली होती. यावेळी सरपंच बाळासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, कल्याण वाणी, पांडुरंग वाणी, अनंतकाका मुळे, बाजीराव दशमे, विक्रम दाभाडे, शिवहरी कोटुळे, संतोष भोसले, अभिजित गायकवाड, भगवान मोरे, दादा गायकवाड, अर्जुन घोलप, रामदास मुळे, हरिओम क्षीरसागर आणि डॉ.गणेश ढवळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



# तलवाडा ग्रामपंचायतला प्रशासक म्हणून काम पाहत असलेले चोपडे आणि ग्रामविकास अधिकारी मुसळे यांनी मलिंदा पायी बोटावर मोजावे इतके लोक गाव तलाव कोरून अतिक्रमण करू लागले?

# गाव तलावाची जागा महसूलची, बेकायदेशीर अतिक्रमण वाल्यांकडून मलिदा घेऊन ग्रामपंचायतचा पीटीआर?

## पीटीआर देताना जिल्हाधिकाऱ्यांचा अधिकृत परवाना घ्यावा लागतो, मात्र ग्रामपंचायतला पीटीआर देण्याचा अधिकार कोणी दिला?

- जिल्हाधिकारी महोदयांनी, गाव तलाव वाचवण्यासाठी तत्काळ अतिक्रमण काढून शासनाच्या आदेश नसताना पीटीआर देणाऱ्यांवर कारवाई करणे गरजेचे?
- गाव तलावाची संरक्षण भीत खुलेआम कोरून अँगल पत्राचे शेड मारू लागले?
- तहसीलदार संदीप खोमणे यांच्या दुर्लक्षपणामुळे गाव तलावाचा गावाला धोखा?

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायतचा कारभार पाच वर्षांमध्ये घोटाळ्याच्या आरोपांमध्ये संपला असून, आता प्रशासक म्हणून चोपडे हे काम पाहत असून तर ग्रामविकास अधिकारी म्हणून मुसळे हे काम पाहत असुन तलवाडा करांना असे वाटले की, प्रशासक लागू झाले आता तरी गावाचं काहीतरी भलं होईल मात्र प्रशासक लागू होताच गावातील सौंदर्यात भर टाकणारे गाव तलाव हे पूर्ण गावाचे तहान भागवत असून आज हे तलाव कोरून संबंधित अधिकाऱ्यांना पाकीट देऊन पत्रा चे शेड मारू लागले असून महसूल च कुठलाच अधिकारी हे काम थांबवण्यासाठी आला नसुन संरक्षण भिंतीचा धोका निर्माण झाला असून याकडे जिल्हाधिकारी साहेब यांनी तात्काळ लक्ष घालून त्या ठिकाणी झालेल्या अतिक्रमण काढण्यात यावे अशी मागणी गावकऱ्यातून होत आहे.

याबाबत सविस्तर माहिती आशि की, गेवराई




तालुक्यातील तलवाडा या गावला दोनशे ते तीनशे एकर परिसरात गाव तलाव असून हे गाव तलाव तत्कालीन जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर यांनी विशेष लक्ष घालून त्यावेळेस जैन संघटना व ब्रेसलेट संघटना यांच्यामार्फत या तलावाची स्वच्छता करून गावाला या तलवा मुळे सौंदर्य प्राप्त झाले व गावची ओळख निर्माण झाली हे तलाव पूर्ण गावाचे तहान भागवत असून या गावातील साईट ने मातीच्या संरक्षण भीती असून की पावसाळ्यामध्ये या संरक्षण भिती भविष्यात

### उपोषणाचा इशारा

गाव तलाव या ठिकाणी माती कोरून काही लोक तलाव धोका निर्माण होईल याचा प्रयत्न करत असून काही नाही तर ही प्लॉट पाडून बेकायदेशीर विक्री केले असल्याचे दिसून येत असून अशा लोकांवर कारवाई न झाल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आंदोलन उभारण्यात येणार असून येत्या सोमवारी संबंधित विभागाशी निवेदन देणार असून हा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा नसता आंदोलन करण्याचा इशारा जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर सौदागर यांनी दिला आहे.

धोका निर्माण होऊ नये म्हणून तयार करण्यात आलेल्या आहेत मात्र येथील सात ते आठ जणांनी मिळून बेकायदेशीर अतिक्रमण केले असून तलावाच्या मातीच्या संरक्षण भीतीच कोरल्या असून त्या ठिकाणी धंदे मांडले असून यामुळे गाव तलावास धोका निर्माण झाला असून आणखीन भरपूर पाऊस राहिले असून भविष्यात हे तलाव कोरल्या मुळे उद्या फुटण्याची शक्यता असेल यामुळे गावास धोखा निर्माण झाला असून भविष्य एक गाव तलाव फुटल्या वर यास जबाबदार कोण? मात्र गाव तलाव महसूलच्या हद्दीत येत असून ज्या ठिकाणी ह्या लोकांनी धंदे मांडले आहेत काहींनी तर घर बांधले असून नियमाची पायमल्ली होताना दिसून येत आहे ग्रामपंचायत ने ठरवा आधार पैसे घेऊन असे लोकांना पीटीआर दिली असून हे पीटीआर देताना जिल्हाधिकारी अधिकृत परवाना घ्यावा लागतो मात्र ग्रामपंचायतला पीटीआर देण्याचा अधिकार कोणी दिला? प्रशासक तलवाडा ग्रामपंचायत काम पाहत असलेले चोपडे व मुसळे ग्रामसेवक मलिदा पाई नुसते बघायची भूमिका का घेत आहेत? महसूल चे हद्दीत काम दिवसाढवळ्या जागा हडप होत असताना तहसील प्रशासनाचे कोणीच का इकडे फिरकत नाही? एवढेच नाही तर ज्या ठिकाणी गाव तलाव कोरून अतिक्रमण केले आहे त्याच्या खाली पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन गेली असून पाईप लिकेज् झाल्यास काम कसे करायचे याकडे तहसीलदार यांची जाणून बुजून दुर्लक्ष होत आहे का तरी याकडे गावाचे गाव तलाव भविष्यात वाचविण्यासाठी अशा लोकावर कारवाई करून जिल्हाधिकारी साहेबांनी लक्ष घालण्याची गरज होत असताना दिसून येत आहे.



# नगरपरिषद कार्यालयासमोर सय्यद सलीमबापुंच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको

## आंदोलकांनी विविध मागण्या लावून धरत मुख्याधिकाऱ्यांना आणले ताळ्यावर

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील नागरी समस्या संदर्भात असणाऱ्या प्रश्नांसह विविध मागण्या लावून धरत आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने सय्यद सलीमबापू यांनी सोमवार दि.३० रोजी सकाळी नगरपरिषद कार्यालय समोर रास्ता रोको केला. यावेळी आंबेडकरी विचार मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या कामकाजाविषयी निषेधाच्या घोषणा करत मुख्याधिकाऱ्यांना ताळ्यावर आणले.



माजलगाव नगर परिषदेमध्ये कार्यरत असलेले प्रशासक तथा मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांचा मनमानी कारभार सुरू आहे. जनतेची अनेक कामे खोळंबली आहेत. परंतु पालिका प्रशासन गेंड्याची कातडी पांघरून आहे. या धोरणाविरुद्ध समाजसेवक व आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी एल्गार पुकारला. संघटनेच्या वतीने वतीने सोमवार दि.३० जुन २०२५ रोजी नगर परिषदेसमोर रास्ता रोको केला.

यावेळी कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या ढिसाळ कामाचा निषेध व्यक्त करत घोषणाबाजी केली. शहरातील नगरपरिषद हद्दीमध्ये किरायदार, भोगवटदार, बेघर या गोरगरीब लोकांना घरकुल देण्यात यावे आलेले नाही. याला मंजुरी देण्यात यावी. आझाद नगर येथे अर्धवट रस्ता तयार करण्यात आलेला आहे, तो पूर्ण करण्यात यावा. सन २०२० ते २०२५ या वर्षात नगरपरिषद माजलगाव यांनी किती गुंठेवारी केल्या याची यादी देण्यात यावी. किती लोकांना ओपनस्पेच्या बोगस पिटीआर देण्यात आल्या याची माहिती देण्यात यावी. शहरात किती ओपनस्पेस, डीपीरोड आहेत याची माहिती देण्यात यावी. इत्यादी मागण्या यावेळी कार्यकर्त्यांनी लावून धरल्या. सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरी विचारू मोर्चाच्या वतीने केलेल्या भव्य रास्ता रोकोने धास्तावलेले पालिका प्रशासन ताळयावर आले. दरम्यान प्रशासनाच्या वतीने मागण्यांसंदर्भात ठोस निर्णय घेण्याचे अभिवचन आंदोलकांना दिले. या आंदोलनात आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू, एडवोकेट सय्यद अल्ताफ यांच्यासह संघटनेचे शेकडो पदाधिकारी सहभागी होते.

# पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची ईव्ही कारमधून विधानभवनात एन्ट्री

मुंबई । प्रतिनिधी

विधीमंडळ अधिवेशनाच्या आजच्या पहिल्याच दिवशी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांची विधानभवनात इलेक्ट्रिक वाहनाने धमाकेदार एन्ट्री झाली. प्रदूषण मुक्त महाराष्ट्रासाठी प्रतिकात्मक संदेश देत त्यांनी इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.




पर्यावरण मंत्री या नात्याने दैनंदिन प्रवासासाठी इलेक्ट्रिक वाहन वापरण्याचा मनोदय व्यक्त करत तशा सूचना त्यांनी काही दिवसांपूर्वी विभागाला दिल्या होत्या, त्यानुसार विभागाकडून महिंद्रा कंपनीची इलेक्ट्रिक कार त्यांना आज उपलब्ध झाली. आजपासूनच विधीमंडळाचे अधिवेशन सुरू झाले असल्याने याच ईव्ही कारमधून त्यांनी रामटेक शासकीय निवासस्थान ते विधानभवन असा प्रवास केला, त्यांचेसमवेत नगर विकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ हया देखील होत्या. दरम्यान, सकाळी रामटेक निवासस्थान येथे त्यांनी ईव्ही कारची विधीवत पूजा केली. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी यावेळी त्यांना 'महिंद्रा एक्सईव्ही नाईन-ई' या मॉडेलची चावी सुपूर्द केली.

**प्रदुषणमुक्तीचा दिला प्रतिकात्मक संदेश**

विधानभवनात आल्यानंतर यासंदर्भात माध्यमांशी संवाद साधताना ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, पर्यावरण मंत्री या नात्याने प्रदुषण कमी व्हावे यासाठी इलेक्ट्रिक वाहनातून प्रवास करत प्रतिकात्मक संदेश देत आहे. या वाहनाने दूरचा प्रवास करणे मला थोडे कठीण जाईल पण मुंबईत तरी ते शक्य होईल, त्यामुळे इव्ही कार वापरण्याचे मी ठरवले. अनेकांना माझं हेच आवाहन असेल की त्यांनी अशा वाहनांचा वापर करावा जेणेकरून वातावरणातील प्रदुषण कमी होण्यास फार मोठी मदत होईल.

# त्या प्राध्यापकाचा तोंडाला काळे फासून गाढवावरून धिंड काढणार : अथर्व मस्के

बीड । प्रतिनिधी



शहरातील उमाकिरण कोचिंग क्लासेस मधील प्रा.विजय पवार व प्रशांत खाटोकर या दोघांनी क्लासेस मधीलच एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून त्या दोघांवर शिवाजी नगर पोलिस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल होताच ते दोघेही फरार झाले होते परंतू या दोघांना मध्यरात्री स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले.


या निंदनीय प्रकाराचे सर्व स्तरातुन निषेध व्यक्त होत असून पालकांच्या व सामाजिक कार्यकर्त्यांच्या संतप्त प्रतिकिया व्यक्त करत आहेत. बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते अथर्व मस्के यांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करून शिक्षकी पेशाला काळिंबा फासणाऱ्या त्या नराधम प्राध्यापकाची गाढवावरून धिंड काढणार असल्याचे सांगितले. तसेच त्या क्लास मधील इतर मुलीवर अत्याचार झाल्याचा संशय व्यक्त करत मुलींनी घाबरून न जाता पोलिस ठाण्यात तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले.

# आष्टी तालुक्यात खुलेआम मुरूमांची चोरी; अवैध उत्खननाने महसूलला लाखो रूपयांच्या तोटा

आष्टी । प्रतिनिधी

मशिन, टॅक्टरच्या साह्याने कसलीही परवानगी न घेता गेल्या अनेक दिवसांपासून तालुक्यातील ठिकठिकाणी खुलेआम मुरूमाचे उत्खनन केले जात असताना उघड्या डोळ्यांनी याकडे पाहणारा महसुल विभाग नेमक करतोय काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी यांच्या नजरा चुकवून लाखो रूपयांचा महसुलला तोटा होत असताना वरिष्ठाचे याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसुन येत आहे. यामुळे मोठमोठ्या डोंगरासह, पहाडी, भुईसपाट होऊ लागले आहेत.

आष्टी तालुक्यातील गायरान, इनाम, सार्वजनिक वनविभाग, डोंगरपटे यासह ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर गेल्या अनेक दिवसांपासून स्थानिक महसुल विभागाकडून कसलीही परवानगी न घेता मशिनच्या माध्यमातून टॅक्टर मध्ये टाकून



दिवसाढवळ्या मुरूमाची चोरी केली जात आहे. वास्तविक मुरूम उत्खनन किवा त्याची वाहतूक करायची असेल तर महसुल कडून तशी रितसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. पण तालुक्यात रस्ता काम सोडता कोणत्याही ठिकाणी परवानगी घेतली जात नसल्याने प्रशासनाला लाखो रूपयाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळधिकारी, तलाठी हे प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी नेमक काय करतात याचा मेळ लागत नाही. मुरूम उत्खनन करणाऱ्यांना कोणाचे अभय आहे. हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून याची चौकशी होऊन मुरूम उत्खननाच्या ठिकाणी पंचनामे करण्याचे आदेश देऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दिपक सोनवणे यांनी केली आहे.

तालुक्यात विना परवाना गौणखनिजाची वाहतूक करतांना आढळल्यास चालू बाजारभावाच्या (५) पाच पट दंडाची आकारणी तसेच वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. सबब तालुक्यातील सर्वच नागरिकांनी रितसर परवानगी घेवूनच मुरूम, माती, दगड याची वाहतूक करण्यात यावी असे प्रसिद्धी पत्रक तहसीलदार वैशाली पाटील यांनी काही महिन्यापुर्वी काढले होते.पण याला देखील ग्रामीण भागात केराची टोपली दाखवत मुरूम उत्खनन होत आहे.

# खाजगी शिकवण्यांचे विद्यार्थ्यांना आकर्षण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आपलीच गुणवत्ता दर्जेदार असल्याची बॅनरबाजी शिकवणी, कोचिंग क्लासेस वाल्यांनी मोठया प्रमाणात केली असल्याने विद्यालये सुरू होताच विद्यार्थ्यांना शिकवणी वर्गाचे आकर्षण वाटत आहे. शहराच्या मुख्य आणि मध्यवर्ती भागात मोठया प्रमाणात शिकवणी, कोचिंग क्लासेसवाल्यांनी आपली दुकाने उघडले असून शिक्षणाच्या नावावर चक्क व्यवसायाची दुकाने थाटली आहेत.

जास्तीच्या बॅनरबाजी मुळे शहरात शिकवणी वर्ग जोमात असल्याचे दिसून येत आहे. शहरात गेल्या अनेक वर्षापासून बेरोजगार तरुणांच्या माध्यमातून खाजगी शिकवणी वर्गांचे पेव फुटले असून विद्यार्थ्याकडून शिकवणी वर्गाच्या नावावर लाखो रुपये जमा होत आहेत. विशेष म्हणजे आपलीच शिकवणी लावण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी आकर्षक बक्षीसे देण्याचीही योजना आखली आहे. या सर्व प्रकाराला पालक बळी पडून लाखो रुपये यावर खर्च करीत आहेत शिकवणी वर्गातील विद्यार्थ्याची छायाचित्रे बॅनरवर प्रसारित करून आपलेच क्लासेस कसे गुणवंत घडवितात याची माहिती देत आहेत.

परंतु शहराच्या विविध भागात दाटीवाटीने लागलेल्या बॅनरमुळे विद्यार्थी आकर्षित होन असल्याचे दिसून येत आहे. तर गेल्या अनेक वर्षात एकदाही शिक्षण या खाजगी कोचिंग क्लासेसची कसलीही चौकशी कोणत्याही विभागाकडून केली गेली नसल्याचे शिक्षण क्षेत्रातील जाणकार सांगतात. त्यांना कुणाचे पाठबळ आहे ? याबाबत तर्क वितर्क निघत आहेत काहीही झाले तरी विद्यार्थी शाळेपेक्षा शिकवणी वर्गाकडे आकर्षित होऊन भरमसाठ फिस भरून तिथेच प्रवेश घेत आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT